नवी मुंबई व औरंगाबाद महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक तसेच अन्य ४ महानगरपालिकांमधील रिक्त पदांच्या पोटनिवडणूक याकरिता मार्च, २०२० मध्ये राबविण्यात आलेला मतदार यादी कार्यक्रम रद्द करण्याबाबत..

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्र.-रानिआ/मनपा-२०२०/प्र.क्र.३/का.५,
नवीन प्रशासकीय भवन, पहिला मजला,
मादाम कामा रोड,हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई - ४०००३२.
दि. १० /१२/२०२०

विषय:- नवी मुंबई व औरंगाबाद महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक तसेच अन्य ४ महानगरपालिकांमधील रिक्त पदांच्या पोटनिवडणूक याकरिता मार्च, २०२० मध्ये राबविण्यात आलेला मतदार यादी कार्यक्रम रद्द करण्याबाबत..

संदर्भ:- १) राज्य निवडणूक आयोगाची अधिसूचना क्र.रानिआ /मनपा-२०१९/प्र.क्र.७/का.५, दि. ३१/१/२०२०

२) राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र.रानिआ /मनपा-२०२०/प्र.क्र.३/का.५, दि. २४/२/२०२० अन्वये देण्यात आलेला मतदार यादीचा कार्यक्रम.

३) राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र. रानिआ/मनपा-२०२०/प्र.क्र.७/का.५ दि. १७/३/२०२०

## आदेश

ज्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए अन्वये राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकांचे पर्यवेक्षण, संचालन व नियंत्रण याची सर्व जबाबदारी राज्य निवडणूक आयोगाची आहे.

आणि ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगाने एप्रिल- मे मध्ये मुदत संपणा-या नवी मुंबई व औरंगाबाद महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीकरिता व इतर ४ पोटनिवडणुकांकरिता दिलेल्या कार्यक्रमानुसार दि.९/३/२०२० रोजी प्रारुप मतदार यादी प्रसिध्द करून दि.१६/३/२०२० पर्यंत हरकती व सूचना मागविण्यात आल्या. त्यापुढे ही यादी दि. २३ मार्च, २०२० रोजी अंतिमरित्या प्रसिध्द करावयाची होती. मात्र राज्यात उद्‌भवलेल्या कोविड-१९ साथीच्या आजाराच्या पार्श्वभूमीवर निवडणुकांची प्रक्रिया पुढे राबविणे जनहिताचे

नसल्याने, आयोगाने जाणीवपूर्वक निर्णय घेवून सर्व प्रक्रिया दि. १७/३/२०२० रोजी आहे त्या स्थितीत पुढील आदेशापर्यंत स्थगित करण्यात आली.

आणि ज्याअर्थी, त्यानंतर केंद्र व राज्य शासनाने सर्व परिस्थितीचा आढावा घेत प्रथम संपूर्ण लॉकडाउन जाहिर केले आणि त्यानंतर कोवीड १९ या साथीच्या आजाराच्या परिस्थितीचा आढावा घेत टप्प्याटप्प्याने लॉकडाउनमध्ये शिथिलता जाहिर केली. याचदरम्यान भारत निवडणूक आयोगाने बिहार विधानसभेच्या निवडणूका घेतल्या तसेच काही राज्य निवडणूक आयोग जसे राजस्थान, केंद्रशासित प्रदेश यांनी तेथील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका देखील घेतल्या आहेत. सदर निवडणूका घेताना कोवीड १९ बाबत विशेष मार्गदर्शक तत्वे अवलंबिण्यात आली होती.

आणि ज्याअर्थी, सदर निवडणुकांकरिता वापरण्यात येणारी मतदार यादी ही १ जानेवारी, २०१९ या अर्हता दिनांकावरती दि. ३१ जानेवारी, २०२० पर्यंत अद्यावत केलेली होती. मात्र दि. १ जानेवारी, २०२० या अर्हता दिनांकावरती मतदार नोंदणीकरिता अर्ज केलेले मतदार समाविष्ट होऊ शकले नाही. यासंदर्भात मा. उच्च न्यायालयाने रिट पिटीशन क्र.३६४८/२०२० मध्ये दि. १३/३/२०२० रोजी असे निरिक्षण नोंदविले आहे की, राज्य निवडणूक आयोगाने, भारत निवडणूक आयोगामार्फत दि. १३ मार्च, २०२० रोजी प्रसिध्द होणारी विधानसभेची प्रारुप मतदार यादी या निवडणुकांकरिता वापरणे शक्य आहे किंवा कसे याबाबत निर्णय घ्यावा.

आणि ज्याअर्थी, कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे दरम्यानच्या कालावधीमध्ये लागू केलेल्या लॉकडाऊनमुळे सुमारे ८ महिन्यांचा कालावधी उलटून गेला असून आता भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार दि. १/१/२०२० या अर्हता दिनांकावर विधानसभा मतदार यादी अद्ययावतीकरण करुन दि.२५.९.२०२० रोजी अंतिम मतदार यादी प्रसिध्द करण्यात आली आहे. यामुळे झालेल्या घडामोडी विचारात घेता या सर्व ठिकाणी नव्याने मतदार यादी कार्यक्रम राबविणे योग्य होईल.

आणि ज्याअर्थी, नवी मुंबई व औरंगाबाद महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीकरिता तसेच अन्य ४ महानगरपालिकांमधील पोटनिवडणुकांकरिता मतदार यादी प्रक्रीयेवरील स्थगिती उठवून निवडणूक घेण्याचा निर्णय घेताना असे निदर्शनास आले की, या महानगरपालिकांच्या मतदार याद्या दि.३१/१/२०२० पर्यंत अद्ययावत केलेल्या व अस्तित्वात असलेल्या विधानसभेच्या मतदार यादीवरून तयार करण्यात आल्या होत्या तसेच सदर विधानसभा मतदार यादी दि. १ जानेवारी, २०१९ या अर्हता दिनांकावर आधारीत होती व भारत निवडणूक आयोगाने १ जानेवारी, २०२० या अर्हता दिनांकावर आधारीत अद्यावत मतदार यादी दि. २५/०९/२०२० रोजी अंतिम मतदार यादी प्रसिध्द केली आहे. त्यामुळे दि. १/१/२०२० या अर्हता दिनांकावर समाविष्ट झालेले मतदार यादीतील सर्व मतदारांना मतदान करण्याची तसेच नव मतदारांना निवडणूक लढविण्यचाची संधी मिळणे हे लोकशाहीच्या मुलभूत तत्वांनुसार आवश्यक आहे. अशा बदललेल्या परिस्थितीत दि.१/१/२०१९ अर्हता दिनांकावर आधारीत जुनी मतदार यादी उपरोक्त महानगरपालिकांच्या निवडणुकांसाठी वापरणे योग्य होणार नाही.

त्याअर्थी, नवी मुंबई व औरंगाबाद महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीकरिता तसेच अन्य ४ महानगरपालिकांमधील पोटनिवडणुकांकरिता दि.२४/२/२०२० रोजीच्या आदेशान्वये दिलेला मतदार यादीचा कार्यक्रम रद्द करणे आवश्यक आहे. त्यामुळे, न्याय्य व मुक्त निवडणूका होण्याच्या दृष्टीने, **महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम १४ (४) मधील अधिकारांचा** वापर करून राज्य निवडणूक आयोग खालीलप्रमाणे विशेष आदेश देत आहे.

## आदेश

**१. नवी मुंबई व औरंगाबाद महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीकरिता तसेच अन्य ४ महानगरपालिकांमधील पोटनिवडणुकांकरिता दि. २४/२/२०२० रोजीच्या आदेशान्वये दिलेल्या मतदार यादी कार्यक्रमास अनुसरून तयार करण्यात येत असलेली मतदार यादी ही १ जानेवारी, २०१९ या अर्हता दिनांकावर आधारीत असल्याने व आता भारत निवडणूक आयोगाकडून अद्यावत यादी उपलब्ध होणार असल्याने; या सर्व नवीन मतदारांचा समावेश होणे न्यायिक असल्याने दि. २४/२/२०२० च्या आदेशान्वये जाहिर केलेला मतदार यादी कार्यक्रम रद्द करण्यात येत आहे.**

२. प्रस्तुत आदेशास स्थानिक वर्तमान पत्रातून तसेच अन्य मार्गाने विस्तृत प्रसिध्दी देण्यात यावी.

३. नवी मुंबई व औरंगाबाद महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीकरिता तसेच अन्य ४ महानगरपालिकांमधील पोटनिवडणुकांकरिता मतदार यादी कार्यक्रम नव्याने जाहिर करण्यात येईल.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

(किरण कुरूंदकर)
सचिव
राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र

प्रति,
आयुक्त,
नवी मुंबई, औरंगाबाद, नाशिक, धुळे, परभणी व ठाणे महानगरपालिका
प्रत-
१) प्रधान सचिव, नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन
२) विभागीय आयुक्त- कोकण, औरंगाबाद, नाशिक
३) माहिती व जनसंपर्क अधिकारी, राज्य निवडणूक आयोग यांना उचित कार्यवाहीसाठी.
४) राज्य निवडणूक आयोगातील निवडणूक कार्यासने.
५) निवड नस्ती.